**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १९८ वा ● शुक्रवार ०८ डिसेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 198 | Date : 08/12/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4


## शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी; विरोधक आक्रमक



नागपूर : राज्यातील अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या मुद्द्यावरून आज अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी कामकाज सुरू होण्याआधी विरोधकांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. विरोधी पक्षातील आमदारांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नी नागपूर येथील विधानभवनाच्या पायऱ्यांवर निदर्शने करत गळ्यात लिंबू-संत्र्यांच्या माळा घालून जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी विरोधी पक्षांनी मागणीचे फलक, लिंबू, संत्री, कापसाची बोंडे असलेल्या माळा गळ्यात घालत सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांचा विरोध केला. विधानभवन परिसरात काँग्रेस आणि ठाकरे गटाच्या शिवसेनेकडून सरकारवर जोरदार हल्लाबोल करण्यात आला. यावेळी 'खोके सरकार हाय हाय' अशी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. याप्रसंगी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यासह विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ गटनेते बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, वर्षा गायकवाड, जयंत पाटील, अनिल देशमुख, सुनील प्रभू, यांच्यासह महाविकास आघाडीतील आमदारांनी । पान २ वर

## साखरेपासून इथेनॉल निर्मिती करण्यावर बंदी, दर नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारचा निर्णय

नवी दिल्ली : सध्या देशात साखरेच्या दरात वाढ झाली आहे. कारण ऊसाच्या उत्पादनात घट झाल्याचा परिणाम दरांवर होत आहे. दरम्यान, याबाबत सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने जूनपासून ऊसापासून इथेनॉल निर्मितीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाबाबत अधिसूचनाही जारी करण्यात आली आहे. या निर्णयानंतर देशांतर्गत बाजारपेठेतील साखरेच्या



वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल, असे मानले जात आहे.

दरम्यान, याबबात ग्राहक व्यवहार आणि अन्न पुरवठा मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत, अन्न आणि सार्वजनिक वितरण विभाग देशातील साखरेचे उत्पादन, विक्री आणि उपलब्धता यावर लक्ष ठेवतो. ज्यामुळं स्थिर किंमतीवर साखरेची उपलब्धता सुनिश्र्चित होते. सरकारनं २०२३-२४ या काळात साखर कारखान्यांना आणि डिस्टिलरींना साखरेच्या रसापासून इथेनॉल बनवू नये असे आदेश दिले आहेत. हा आदेश । पान २ वर

### इथेनॉलच्या उत्पादनावर घातलेली बंदी म्हणजे तुघलकी निर्णय, राजू शेट्टींचा सरकारवर निशणा

मुबई : केंद्र सरकारनं इथेनॉलच्या उत्पादनावर घातलेली बंदी म्हणजे तुघलकी निर्णय आहे. हे आम्हाला कदापी मान्य नसल्याचे वक्तव्य स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केलं. देशात साखर कमी पडून साखरेचे दर वाढतील या भितीने केंद्रानं इथेनॉल निर्मितीवरील घातलेली बंदी तातडीने मागे घ्यावी, अशी मागणी राजू शेट्टी यांनी



केली. केंद्र सरकारनं साखर उद्योगातील खासगी आणि सहकारी साखर कारखान्यांना प्रोत्साहन , सबसिडी आणि व्याजामध्ये सवलत देऊन इथेनॉलचे प्रकल्प उभे करण्यास सांगितले आहे. साखर उद्योगाला चालना मिळावी यासाठी केंद्राने इथेनॉल निर्मितीला चालना दिली आहे. यामुळं कोट्यवधी रुपयांचे भाग भांडवल देशातील साखर उद्योगानं यामध्ये गुंतवले आहेत. अशातच अचानक केंद्र सरकारनं इथेनॉलच्या उत्पादनावर बंदी घातली आहे. याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्यावर देखील होणार असल्याचे राजू शेट्टी म्हणाले. केंद्र सरकार ही बंदी घालून शांत बसेल. मात्र, इथेनॉलमध्ये साखर कारखान्यांनी अब्जावधी रुपये गुंतवले आहेत, त्याचे काय होणार आहे. याचे उत्तर केंद्र सरकारकडे नसल्याचे शेट्टी म्हणाले. देशात यंदा साखरेचे उत्पादन कमी होणार आहे. त्याला। पान २ वर

## अर्जुन मुंडा भारताचे नवे कृषीमंत्री

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केंद्रीय मंत्री नरेंद्र सिंह तोमर, प्रल्हाद सिंह पटेल आणि रेणुका सिंह सरुता यांचे राजीनामे स्वीकारले आहेत. आता केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा यांच्याकडे कृषी मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. तर राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांच्याकडे अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या राज्यमंत्रिपदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला. राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांच्याकडे जलशक्ती मंत्रालयाच्या राज्यमंत्रिपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. राज्यमंत्री भारती प्रवीण पवार यांच्याकडे आदिवासी व्यवहार मंत्रालयात राज्यमंत्री म्हणून अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

## नागपूर येथे ९ आणि १० डिसेंबरला नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने 'नमो महारोजगार मेळाव्याचे' आयोजन दिनांक ९ आणि १० डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले आहे. 'नमो महारोजगार मेळावा सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजता, जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमा अंतर्गत आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार योजनेद्वारे हा महामेळावा होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित मेळाव्यात विविध पदांसाठी ७०० नियुक्त्या होणार आहेत. या मेळाव्याच्या माध्यमातून तब्बल ४० हजारांहून अधिक जागांसाठी पदभरती होणार आहे. या रोजगार महामेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले.

नमो महारोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी उमेदवारांनी www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. नमो महारोजगार बटनवर क्लिक करून, विचारलेली माहिती संपूर्णपणे भरून नोंदणी पूर्ण करावी. मंत्री श्री.लोढा म्हणाले की, या महारोजगार मेळाव्यात स्टार्टअप्स, इन्क्युबेटर्स आणि इनवेस्टर्स तसेच नामांकित कंपन्या सहभागी । पान २ वर






## धान उत्पादकांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री थेट बांधावर नागपूर जिल्ह्यातील नुकसानीची पाहणी

नागपूर : नागपूर जिल्ह्यामध्ये २६ ते २८ नोव्हेंबर कालावधीत झालेल्या अवकाळी पावसाने विशेषत: जिल्ह्यातील धान पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. नागपूर अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सभागृहाचे कामकाज आटोपल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषीमंत्री धनंजय मुंडे, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी नागपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात झालेल्या नुकसानीची पाहणी केली. नागपूर जिल्ह्यामध्ये २६ ते २८ नोव्हेंबर या कालावधीत अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान केले. नागपूर जिल्ह्यात मौदा, पारशिवनी, रामटेक, कामठी, सावनेर व हिंगणा या सहा तालुक्यात भात, कापूस आणि तूर या पिकांचे जवळपास ५ हजार ४८ हेक्टर क्षेत्रात नुकसान झाले आहे. या नुकसानाची पाहणी मुख्यमंत्र्यांनी आपल्या सहकारी मंत्र्यांसोबत आज केली.

रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार कृपाल तुमाने, आमदार आशिष जायस्वाल, टेकचंद सावरकर यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत त्यांनी दुपारी ३ च्या सुमारास मौदा तालुक्यातील तारसा, निमखेडा या गावांच्या शिवारात भेटी दिल्या. यावेळी त्यांनी थेट शेतात जाऊन धानपिकांच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांसोबत त्यांनी चर्चा केली. तातडीने उर्वरित पंचनामे पूर्ण करण्याचे त्यांनी । पान २ वर



## प्रशासनाची लेखी हमी..म्हेत्रेंची शिष्टाई..मात्र उपोषणकर्ते उपोषणावर ठाम



### गेल्या ३० वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा : माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे

उजनीचे पाणी अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्याला मिळावे या संदर्भात गेल्या ३० वर्षांपासून माझा सातत्याने पाठपुरावा राहिला आहे यासाठी रात्रंदिवस प्रामाणिकपणे प्रयत्न केला असून आता त्याचे फलित मिळणार असल्याचे समाधान आहे.या कामाच्या संदर्भात ज्यांना श्रेय घ्यायचे आहे त्यांनी बिनधास्त घ्यावे.जनतेला चांगलेच ठाऊक आहे पाठपुरावा कुणाचा झाला आहे.

## अखेर कुरनुर धरणात उजनीचे पाणी येणार..!

सोलापूर/विशेष प्रतिनीधी : अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्याला उजनी धरणातील हक्काचे पाणी मिळावे यासाठी गेल्या नऊ दिवसापासून कृष्णा पवार यांनी उपोषण सुरू केले आहे. याची दखल घेऊन लाभक्षेत्र विकास प्राधिकरण कडून शुक्रवारी संध्याकाळी उजनीतून पाणी सोडण्यासंदर्भात लेखी पत्र देण्यात आले. प्रशासन आणि उपोषणकर्त्यांमध्ये माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी शिष्टाई केली खरी परंतु उपोषणकर्ते कृष्णात पवार यांनी पाणी सोडल्याशिवाय उपोषण सोडणार नसल्याचे सांगितले. अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील जनता गेल्या ३० वर्षांपासून उजनीतील पाण्याच्या प्रतीक्षेत आहे.यासाठी अनेक स्थित्यंतरे झाले असून अद्यापही पाण्याचा एक थेंबही उजनीतून अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्याला मिळालेला नाही.या पार्श्र्वभूमीवर कुंभारी परिसरातील शेतकऱ्यांच्या मदतीने उपोषणकर्ते कृष्णा पवार यांनी गेल्या नऊ दिवसांपासून उपोषण सुरू केले असून याची दखल संबंधित विभागाने आता घेतली आहे. गुरुवारी सकाळी लाभक्षेत्र विकास प्राधिकरण चे कार्यकारी अभियंता संभाजी माने यांनी शुक्रवारी संध्याकाळी पाणी सोडण्यासंदर्भात लेखी पत्र माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या शिष्टाईने उपोषणकर्ते कृष्णात पवार यांना दिले परंतु उपोषणावर पवार यांनी ठाम असल्याचे सांगितले.पाणी सोडल्याशिवाय अन्नाचा एक कणही घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सध्या पाणी घेत असलेल्या पवार यांनी वैद्यकीय इलाजासाठी होकार दिला.दरम्यान उजनीतून सुटणारे पाणी हे आगामी दुष्काळी परिस्थितीत अक्कलकोट तालुक्यातील ५१ गावे आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील १७ गावांसाठी दिलासादायक ठरणार आहेत.

यावेळी उपोषणकर्ते कृष्णा पवार यांच्या समवेत शिवानंद आंदोडगी,सामाजिक कार्यकर्ते महेश बिराजदार,अनिल बर्वे, अमित ढोले,शिवानंद माळी,बिपीन करजोळे,शिरीष पाटील,गंगाधर बिराजदार,दिपक पाटील,बसवराज शेगावकर, रेवणसिद्ध कोळी,मारुती कदम,श्रीशैल माळी,विश्र्वेश बाळगी,अनिल जाधव आदी उपस्थित होते. अक्कलकोट व दक्षिण तालुक्यातील ७२ गावांना पाणी मिळावे यासाठी सुरू असलेल्या आमरण उपोषणाला जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविले होते. एकरूख उपसा सिंचना अंतर्गत एकूण ७२ गावांना हक्काचे पाणी मिळवण्यासाठी गेल्या आठ दिवसापासून कर्देहळ्ळी फाट्याजवळ सर्व शेतकरी आणि पाणी संघर्ष समितीच्या वतीने आमरण उपोषण सुरू होते. कृष्णात पवार यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. प्रशासनाने लवकरात लवकर एकरूख उपसा सिंचन

### पाण्याचा प्रवास कसा असेल..?

**उजनी धरणातून उद्या सुटणारे पाणी कारंबा पंपाऊस-एकरूख पंप हाउस-बोरामणी-दर्गनहळ्ळी कालव्यातुन दक्षिण सोलापूर तालुक्यातील रामपुर,हणमगांव येथील तलाव तर अक्कलकोट तालुक्यातील दर्शनास येथील हरणा नदीतुन कुरनूर धरणात पाणी सोडण्यात येणार आहे.**

### आमरण उपोषणाला जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविले



योजनेमध्ये टेल टू हेड पाणी सोडावी अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. दरम्यान बुधवारी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी आंदोलन स्थळाला भेट दिली. दक्षिण व अक्कलकोट तालुक्याला हक्काचं पाणी मिळावी अशी मागणी करताना वेळ पडले तरी आपणही आंदोलनात सहभागी होणार असल्याचं शिवानंद पाटील..असे पाटील म्हणाले.

याप्रसंगी त्यांनी लाभक्षेत्र प्राधिकरण विभागाचे कार्यकारी अभियंता धीराजे साळे यांच्याबरोबर ही त्यांनी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून आंदोलनाची भूमिका यावेळी मांडली. याप्रसंगी आमरण उपोषण करते कृष्णात पवार आणि संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भूमिका मांडली याप्रसंगी दक्षिण व अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी प्रमुख नेते मंडळी उपस्थित होते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

शुक्रवार दि.०८ डिसेंबर २०२३



## संपादकीय

### काँग्रेसच्या ताब्यातून गेली..

मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांत ज्या दणदणीतपणे भाजपचा विजय झाला आहे, त्यावरून देशात केवळ 'मोदी की गॅरंटी'च काम करते, यावर शिक्कामोर्तब झाले आहे. तीनही राज्यांत भाजपने नियोजनबध्द योजना आखून या निवडणुकीत विजय प्राप्त केला आणि मोदी यांना २०२४ मध्ये टक्कर देण्याचे स्वप्न पाहणाऱ्या 'इंडिया' आघाडीचे स्वप्न भंगले. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी तेलंगणापासून सुरू केलेल्या 'भारत जोडो' यात्रेपासून स्वतःबद्दल माध्यमांच्या मदतीने विश्वास निर्माण केला होता, त्याचा चक्काचूर झाला आहे. भारतात केवळ एकच गॅरंटी काम करते आणि ती 'मोदी की गॅरंटी' आहे, यावर जनतेचा विश्वास बसला आहे. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी आणि इंडिया आघाडीचे सारेच नेते स्वतःला मोदी यांना पर्याय म्हणून समोर आणण्याच्या तयारीत होते. त्यांचा पार सफाया झाला आहे. तेलंगणाने थोडी फार साथ दिली नसती तर काँग्रेसला तोंड काढणे मुश्कील झाले असते. 'मोदी की गॅरंटी'मुळे राहुल आणि कंपनीच्या अस्तित्वावरच अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. काँग्रेसला राहुल आणि प्रियांका हे विजय मिळवून देऊ शकत नाहीत, हे अजून किती काळ समजणार नाही, हा एक प्रश्न आहे. या निकालामुळे लोकसभा निवडणुकीतही मोदी यांच्या विजयाची हॅट्ट्रिक साध्य केली जाणार ही बाब अधोरेखित झाल्यासारखीच आहे. काँग्रेसला आता लोकसभेच्या जागा वाटपात पूर्वीचे स्थान तर राहिले नाही. उलट इंडिया आघाडीतील इतर घटक पक्ष काँग्रेसच्या वाट्याला जितक्या जागा देतील तितक्यावर समाधान मानण्याशिवाय काँग्रेसला गत्यंतर नाही, अशी वाईट परिस्थिती काँग्रेसला आली आहे. काँग्रेसची बार्गेनिंग पॉवर प्रचंड घटली आहे. संपूर्ण निवडणूक प्रचारात मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार प्रहार केले. पण त्यापेक्षाही मोदी यांच्या ताब्यात देश सुरक्षित आहे, यावर जनतेचा जास्त विश्वास होता आणि तो आणखी दृढ झाल्याचे दिसले. कोणत्याही गोष्टीची गॅरंटी नसते पण 'मोदी की गॅरंटी' हीच तेवढी खरी असते, यावर जनतेनेच शिक्कामोर्तब केले. भाजपने मोदी की गॅरंटीवर प्रचाराचा भर ठेवला होता आणि त्याचे परिणाम आज तीन राज्ये काँग्रेसच्या ताब्यातून गेली आहेत.

पान १ वरुन

### शेतकऱ्यांना कर्जमाफी

हातात निषेधाचे काळे फलक हाती घेत 'खोके सरकार हाय हाय, शेतकरी झाला कासावीस खोके सरकार ४२०', अशी घोषणाबाजी केली. राष्ट्रवादी, शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसच्या आमदारांकडून शिंदे-फडणवीस सरकारचा निषेध नोंदवताना विरोधक आक्रमक झाले होते.

अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. कापूस, सोयाबीनला भाव नाही. शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आहे. अशा स्थितीत सरकार केवळ पंचनामे करत आहे. आम्हाला घोषणा नकोत तर शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा व्हायला पाहिजेत, अशी मागणी करत शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. सरकारविरुद्ध हल्लाबोल करताना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले, बळीराजा अवकाळीने त्रस्त असताना सरकार मात्र जाहिरातीत व्यस्त आहेत. सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नावर असंवेदनशील असून त्यांच्याशी निष्ठूरपणे वागत आहे.

### साखरेपासून इथेनॉल निर्मिती

तात्काळ लागू झाला आहे. परंतु बी-हेवी मोलॅसेसपासून इथेनॉलचा पुरवठा करण्यासाठी तेल विपणन कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या आदेशांसाठी इथेनॉलचा पुरवठा सुरु राहणार आहे. या निर्णयाबाबत मंत्रालयाने पेट्रोलियम मंत्रालयालाही कळवले आहे.

भारत सरकार साखरेपासून इथेनॉल निर्मितीच्या उत्पादनावर बंदी घालू शकते अशा बातम्या येताच, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत न्यूयॉर्क एक्सचेंजमध्ये साखरेचे भाव सुमारे ८ टक्क्यांनी घसरले आहेत. या निर्णयाचा परिणाम देशांतर्गत बाजारातही दिसून येईल, असे मानले जात आहे. साखरेचे भाव खाली येण्याची शक्यता आहे.

सरकारच्या या निर्णयामुळं साखर उत्पादक कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली आहे. बलराम चिनी ६.६० टक्के, दालमिया भारत ६.०८ टक्के, बजाज हिंदुस्थान ५.४१ टक्के, डीसीएम श्रीराम ५.८० टक्के घसरणीसह बंद झाले आहेत.

### इथेनॉलच्या उत्पादनावर घातलेली

केंद्र सरकारचे धोरण कारणीभूत आहे. पुढील वर्षीही साखरेची परिस्थिती याहून अधिक गंभीर परिणाम होणार आहे. देशातील ऊसाचे क्षेत्र कशामुळं कमी झाले आहे. याच्या मुळापर्यंत जाणे गरजेचे असल्याचे राजू शेट्टी म्हणाले. रासायनिक खतांच्या किंमती प्रचंड वाढल्या आहेत. उत्पादन खर्च वाढलेला आहे. शेतकऱ्यांना ऊसाची शेती परवडत नाही. देशात दुष्काळाचे सावट आहे. अशा परिस्थितीमध्ये देशातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारने तातडीने आर्थिक सहाय्य करणे गरजेचे आहे. त्यांना ऊस लागवडीमध्ये प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. तरच देशातील उसाचे उत्पादन वाढून साखर उत्पादीत होणार आहे. केंद्राने घेतलेला हा विदुषकी निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी राजू शेट्टी यांनी केली आहे.


### धान उत्पादकांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री

सांगितले. नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यांमध्ये ३३५ गावांमध्ये या अवकाळी पावसाचा तडाका बसला आहे. जवळपास २ हजार ८८ हेक्टरमधील ६ हजार ८८६ शेतकऱ्यांचे यामध्ये नुकसान झाले आहे. आतापर्यंत ५२ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहे.

### नागपूर येथे ९ आणि १०

होणार आहेत. नागपूर जिल्ह्यातील दहावी, बारावी, आयटीआय, पदविका, पदवीधर, पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांच्या तेथेच मुलाखती घेवून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विभागाच्या वेगवेगवेगळया योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी या ठिकाणी स्टॉल्सही उभारण्यात येणार आहेत.

स्टार्टअप्स उभारण्यासाठी लागणाऱ्या सर्व सोयीसुविधा इनोव्हेटर्सच्या सगळ्या शंकांच निरसणही केले जाणार आहे.एकाच छताखाली इनोव्हेटर्स, इन्क्युबेटर्स आणि इनवेस्टर्स यांच्यासाठी हा मेळावा पर्वणी ठरणार आहे. उद्योगाला लागणारे मनुष्यबळ, स्टार्टअप्ससाठी मार्गदर्शन, इन्व्हेस्टर्ससाठी गुंतवणुकीच्या संधी या मेळाव्यात तयार होतील. यासाठी अधिकाधिक संख्येत स्टार्टअप्स, इनवेस्टर्स आणि इनकुबेटर्सनी या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन मंत्री श्री.लोढा यांनी केले आहे.




# डॉ.आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना विश्र्वाला प्रेरणा देते : प्रा.करण पाटील

## स्वेरीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

पंढरपूर/प्रतिनिधीः 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना संपूर्ण विश्र्वाला प्रेरणा देणारी अशी आहे. ग्रामीण भागात जावून विश्र्वबंधुत्वाची तत्वे पटवून समाज बांधणीचे कार्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. आयुष्यभर विद्यार्थी राहून समाजाला जागृत करण्याचे कार्य महामानव डॉ. आंबेडकर यांनी केले. कोणत्याही घटकात भेदभाव होऊ नये हा दृष्टीकोन समोर ठेवून त्यांनी राज्यघटना लिहीली.' असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा. करण पाटील यांनी केले.



गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या 'महापरिनिर्वाण दिना' निमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. प्रारंभी भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती यांच्या हस्ते करण्यात आले. प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. करण पाटील यांनी 'महापरिनिर्वाण दिना'चे महत्व सांगून डॉ. आंबेडकरांच्या कार्यावर प्रकाश टाकताना पुढे म्हणाले की, 'भारतरत्न डॉ. आंबेडकर यांनी समाजासाठी व समाजाच्या विकासासाठी कार्य केले. भारतातील वर्ग लढ्याला आणि जाती अंताच्या लढ्याला आकार आणि योग्य दिशा देण्याचे भरीव काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. जागतिक पातळीवर शोषण मुक्ती आणि समतेसाठीच्या लढ्यांमध्येही बाबासाहेब आंबेडकर प्रेरणादायी ठरले आहेत. वर्ग, जात, धर्म, लिंग या आधारावर भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काम केले होते.' असे सांगून त्यांनी डॉ.आंबेडकर यांचे समाजासाठीचे योगदान अभ्यासपूर्ण शैलीत मांडले. यावेळी ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे अधिष्ठाता प्रा. अविनाश मोटे, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.मिनाक्षी पवार, प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. सतिश लेंडवे, डॉ. एच.एच. पवार, रजिस्ट्रार राजेंद्र झरकर, एमसीए विभागाचे प्रमुख प्रा. मनसब शेख, प्रा. अविनाश पारखे, प्रा. अविनाश कोकरे व इतर प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी संतोष जाधव, समाधान मोरे, दत्तात्रय लोंढे, अमोल चंदनशिवे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.

# विकसित भारत संकल्प यात्रेचा उपक्रम राज्यात प्रभावीपणे राबवा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



नागपूर : समाजातील सर्वसामान्य घटकांच्या कल्याणासाठी केंद्र शासनाने विविध योजना सुरु केल्या आहेत. त्या लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित भारत संकल्प यात्रा हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या यात्रेच्या माध्यमातून नागरीकांना विविध योजनांचा लाभ मिळणार असल्याने या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले.मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी रामगिरी येथे विकसित भारत संकल्प यात्रेच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. त्यावेळी राज्यातील सर्व जिल्हा प्रशासनांना याबाबत विस्ताराने सुचना दिल्या. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांच्यासह विविध विभागाचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलिस अधीक्षक उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या अनेक फ्लॅगशिप योजनांपासून अजूनही काही लाभार्थी वंचित आहेत. या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांना योजनांची माहिती व लाभ देण्यासाठी संपुर्ण देशभर हा यात्रेचा उपक्रम राबविली जात आहे. समाजातील सर्वच घटकातील वंचित लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी राबविण्यात येत असलेली ही मोहिम राज्यात प्रभावीपणे राबवा. जास्तीत जास्त लाभार्थ्यांना उपक्रम काळात लाभ देण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यात हा उपक्रम अधिक चांगल्या पद्धतीने कसा राबविता येईल, याकडे लक्ष दिले पाहिजे. यात्रेचा जनजागृती रथ गावांमध्ये जात असतांना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याठिकाणी उपस्थित राहून आपल्या योजना गावकऱ्यांना समजावून सांगितल्या पाहिजे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात आघाडीवर राहील, यासाठी ग्राम स्तरावर काम करणाऱ्या सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक पात्र लाभार्थ्यांस या उपक्रम कालावधीत विविध योजनांचा लाभ मिळाला पाहिजे, असे सांगितले. उपक्रमाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र आघाडीवर असला पाहिजे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हा उपक्रम अतिशय महत्वाचा ठरणार आहे, असे उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील हा उपक्रम राज्यात प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना केल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी आपआपल्या जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबवितांना जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याचा प्रयत्न करावा, असे सांगितले. मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडून उपक्रमाच्या अंमलबजावणीची माहिती घेतली. केंद्र शासनासह राज्याच्या योजनांची देखील या कालावधीत जनजागृती केली जावी, असे त्यांनीसुचविले.

# रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर येथे महामानवास महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



धाराशिव/प्रतिनिधीः रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर येथे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. कैलास मोटे, हे होते तर अध्यक्ष स्थानी प्रा.माऊली बडे हे होते.या वेळी प्रा. शशिकांत चिल्लरगे ,प्रा डॉ हिरकन शेतकर मॅडम, प्रा रतन लहाने ,प्रा राधिका माने,ग्रंथपाल मनिषा लातूरकर व बी एड चे छात्र अध्यापक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी एड प्रशिक्षणार्थी सुशिल बोंबडे यांनी केले .तर प्रास्ताविक प्रा. उमेश रणदिवे यांनी केले.आभार प्रदर्शन बी एड प्रशिक्षणार्थी सूरज सोनटक्के यांनी केले. यावेळी स्टाफ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अक्कलकोट वंचित बहुजन आघाडीच्या लढ्याला अखेर यश

✻ अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे डॉ रविंद्र बनसोडे यांची अखेर वैद्यकीय अधीक्षक म्हणून नियुक्ती ✻ वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट कडून नूतन वैद्यकीय अधिक्षक डॉ रवींद्र बनसोडे यांचे सत्कार



अक्कलकोट/प्रतिनिधीः गेल्या दीड वर्षापासून अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे वैद्यकीय अधीक्षक म्हणून गोर गरीब रुग्ण असतील किंवा मध्यमवर्गीय रुग्ण असतील अश्याची जबाबदारी घेणारे अधिकारी नव्हते, अनेक वेळा गोरगरीब रुग्ण डॉक्टर उपलब्ध नसल्याने त्यांना खूप त्रास होत होता, प्रसूती महिला आल्या की, सोलापूरचा रस्ता दाखवला जायचा, काही महीलाचे रस्त्यावर प्रसूती झाली आहेत, अश्या अनेक घटना घडल्या आहेत. अश्या अनेक अडचण येत असल्यामुळे अक्कलकोट वंचित बहुजन आघाडीच्या सर्व युनिटने हा विषय दीड वर्षापासून संबधित त्या वेळी शल्य चिकित्सक अधिकारी यांना निवेदन देण्यात आले होते परंतु याची दखल मात्र कोणी घेतं नव्हते, अनेक सामाजिक संघटना , संस्थेने शल्य चिकित्सक सोलापूर यांना पत्र पाठवून या बाबत सांगितले होते .

प्रत्येक वेळी काही तरी कारणे देऊन टाकले जात होते, गेल्या १ डिसेंबरला डॉ.सुहास माने जिल्हा शल्य चिकित्सक सोलापूर यांना वंचित बहुजन आघाडी तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांनी आमरण उपोषणाचा इशारा देऊन होणाऱ्या गंभीर परिणामास पूर्णपणे प्रशासन जवाबदार असेल अश्या आशयचे पत्र,व दूरध्वनी वरून सांगण्यात आले देण्यात त्यानंतर लागलीच प्रशासनाने तुरंत याची दखल घेत अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे वैद्यकीय अधीक्षक म्हणून डॉ रविंद्र बनसोडे यांची नियुक्ती करण्यात आली असून संपूर्ण अक्कलकोट तालुका गोरगरीब,मध्यम वर्गीय असतील सर्वसामान्य लोक समाधान व्यक्त करीत आहे, त्यामुळे वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट तालुका व शहर तसेच युवक आघाडी तालुका व शहर यांच्या वतीने डॉ रविंद्र बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला यावेळी तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, युवक आघाडी तालुका अध्यक्ष शिलामनी बनसोडे, शहर अध्यक्ष विशाल ठोंबरे, युवक आघाडी शहर अध्यक्ष संदीप बाळशंकर, शहर महासचिव भारत देडे, तालुका संघटक बबन गायकवाड,, युवक संघटक हणमंत जाधव,, दयानंद गायकवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते...

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble



# नळदुर्ग येथे श्री शिवलिंगेश्वर हिरेमठाचे निर्विकल्प समाधिस्त

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :नळदुर्ग येथील श्री शिवलिंगेश्र्वर हिरेमठाचे निर्विकल्प समाधिस्त राजगुरू श्री ष.ब्र.१०८ शिवलिंगेश्र्वर शिवाचार्य म्हास्वामीजी यांचा पुण्यस्मरण सोहळा दि.५ डिसेंबर रोजी शिवलिंगेश्र्वर हिरेमठात मोठया उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी श्री शिवलिंगेश्र्वर हिरेमठाचे मठाधिपती श्री ष.ब्र.बसवराज शिवाचार्य महाराजांच्या संकल्पनेतुन मराठवाडा मुक्तीसंग्राम आंदोलनाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधुन या पुण्यस्मरण सोहळा कार्यक्रमात स्वातंत्र्य सैनिकांचे वारसदार, माजी सैनिक, डॉक्टर, सेवानिवृत्त शिक्षक, पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांचा म्हास्वामीजींच्या हस्ते सत्कार करून गौरव करण्यात आला.

सालाबादाप्रमाणे याहीवर्षी नळदुर्ग येथील श्री शिवलिंगेश्र्वर हिरेमठाचे निर्विकल्प समाधिस्त राजगुरू श्री ष.ब्र.शिवलिंगेश्र्वर शिवाचार्य म्हास्वामीजी यांचा पुण्यस्मरण सोहळा दि.४ व ५ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री म.नी. प्र.शिवबसव म्हास्वामीजी विरक्तमठ खेडगी हे होते.दिव्य सानिध्य श्री म.नी. प्र.राजशेखर म्हास्वामीजी विरक्त मठ नंदगाव तर सानिध्य श्री म.नी. प्र.श्री शांतलिंगेश्र्वर म्हास्वामीजी हे होते तर नेतृत्व श्री ष.ब्र.शिवयोगी शिवाचार्य निलकंटेश्र्वर मठ अणदुर,श्री म.नी. प्र. शंकरराजेंद्र म्हास्वामीजी,म.नी. प्र.श्री मुरघेन्द्र म्हास्वामीजी,श्री ष.ब्र.मल्लिकार्जुन शिवाचार्य,श्री ष.ब्र.सुत्तरेश्र्वर शिवाचार्य,श्री .ष.ब्र.शिवानंद शिवाचार्य,श्री म.नी. प्र.बसवलिंग म्हास्वामीजी,म.नी. प्र.विरंतेश्र्वर म्हास्वामीजी,श्री पुज्य प्रभु देवरू हे उपस्थित होते. प्रारंभी श्री शिवलिंगेश्र्वर हिरेमठाचे मठाधिपती श्री .ष.ब्र.बसवराज शिवाचार्य महाराजांनी सर्व म्हास्वामीजींचा सत्कार केला. सकाळी सहा वाजता महारुद्राभिषेक व दीक्षा अय्याचार हा कार्यक्रम झाला. त्यानंतर सकाळी १० वा. राजगुरू श्री शिवलिंगेश्र्वर शिवाचार्य म्हास्वामीजी यांचा पुण्यस्मरणोत्सव व धर्मसभा तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा म्हास्वामीजींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर म्हस्वामीजींनी मार्गदर्शन केले. शेवटी महाप्रसाद झाल्यानंतर सोहळ्याची सांगता झाली. या कार्यक्रमास श्री शिवलिंगेश्र्वर हिरेमठाचे शिष्य, भक्तगण व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन माजी नगरसेवक विनायक अहंकारी व दत्तात्रय कोरे यांनी केले. पुण्यस्मरण सोहळा यशस्वी होण्यासाठी श्री शिवलिंगेश्र्वर हिरेमठाचे मठाधिपती श्री ष.ब्र.बसवराज शिवाचार्य महाराजांच्या मार्गदर्शनाखाली मल्लिनाथ माळगे, माजी नगरसेवक बसवराज धरणे, महेश कोप्पा पाटील, ज्योती बचाटे, बंडप्पा कसेकर, शिवाजी मुळे, सेवानिवृत्त शिक्षक गुरुनाथ मुळे , भीमाशंकर बताले यांच्यासह सर्वच लिंगायत समाज बांधवांनी परीश्रम घेतले.

# ध्वजदिन निधी संकलनाच्या माध्यमातून नागरिकांनी देशसेवेत सहभाग घ्यावा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## ध्वजदिन निधी संकलनासाठी मुख्यमंत्र्यांनी दिले एक महिन्याचे वेतन

नागपूर/प्रतिनिधीः ध्वजदिन निधी संकलनात नागरिकांनी जास्तीत-जास्त योगदान देत देशसेवेत सहभाग घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले. तसेच, ध्वजदिन निधी संकलनासाठी स्वत:चे एक महिन्याचे वेतन देण्याची घोषणाही मुख्यमंत्री यांनी केली.

रामगिरी येथे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने आयोजित केलेल्या ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या हस्ते झाला. यावेळी ते बोलत होते. विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर डॉ. शिल्पा खरपकर उपस्थित होत्या.



मुख्यमंत्री म्हणाले, 'हम करे राष्ट्र आराधन तन से, मन से, धन से, जीवन से' या ब्रिदाप्रमाणे प्रत्येक भारतीयांनी आपल्या देशासाठी योगदान देण्याची गरज आहे. सीमेवर सैनिक देशरक्षणासाठी अहोरात्र तैनात असतात. देशाच्या प्रगतीतही सैनिकांचे योगदान महत्वाचे आहे. लष्कराच्या कल्याणासाठी खारीचा वाटा उचलण्याची संधी देणारा ध्वजदिन निधी संकलनाचा उपक्रम अनेक वर्षांपासून राज्यात सुरू आहे. सैनिकांप्रती कृतज्ञभाव व्यक्त करण्यासाठी नागरिकांनी ध्वजदिन निधी संकलनात योगदान देण्यासाठी मोठ्या संख्येने पुढे येण्याचे आवाहन, मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केले. भारत देश संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होत आहे. संरक्षण साहित्याची खरेदी करणारा देश म्हणून असलेली भारताची ओळख आता संरक्षण साहित्याचा विक्रेता देश अशी झाली आहे. भारतीय आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याचे नुकतेच पंतप्रधानाच्या हस्ते सिंधुदुर्ग किल्यावर अनावरण करण्यात आले. जम्मू-काश्मिरमध्ये देशाच्या सीमेवर कुपवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्र्वारुढ पुतळ्याचे अनावरण करण्याचे सौभाग्य आपणास लाभल्याचा उल्लेखही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केला. ध्वजदिन निधी संकलनात देण्यात आलेल्या उद्दिष्टापेक्षा जास्त १८५ टक्के ध्वजदिन निधी संकलन केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नागपूर जिल्ह्याचा स्मृतीचिन्ह देवून गौरव करण्यात आला. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी हा सन्मान स्वीकारला. ध्वजदिन निधी संकलनात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव करण्यातआला.

# शिव बुद्ध प्रतिष्ठान व रिपाइं च्या वतीने जांबुड येथे बाबासाहेबांना अभिवादन

श्रीपुर प्रतिनिधी / रविराज बनसोडेः जांबुड येथे शिव बुद्ध प्रतिष्ठान व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाच्या वतीने विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब



आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी सरपंच व सोसायटीचे चेअरमन मा. राहुल खटके, ग्रामसेवक जाधव भाऊसाहेब ग्रा.पं सदस्य शिवाजी केचे, विलास केचे, नेवरे ग्रामपंचायतीचे गट नेते व राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष गजानन पाटील, युवक नेते सुमित भोसले,शिवसेना तालुका संपर्क प्रमुख नितीन वाघमारे,आरोग्य उपकेंद्राचे डॉ.नाईकनवरे,माजी उपसरपंच महावीर माने,विठ्ठल भोसले,होलार समाज संघटना ता.उपाध्यक्ष तुकाराम कांबळे,सचिन चंदनशिवे, संचालक बापु मोरे,समाधान नाईकनवरे, पत्रकार दादा माने,दलित महासंघ तालुका अध्यक्ष प्रदीप नाईकनवरे, युवा नेते झाकिरहुसेन शेख, पत्रकार विनोद धुमाळ,तुकाराम व्हरगळ, नितीन नाईकनवरे, उपस्थित होते तसेच सोमनाथ बनसोडे, विकास चंदनशिवे, महावीर बनसोडे, योगेश वाघमारे, दयानंद भोसले,विशाल चंदनशिवे, गणेश कांबळे,गुरुदेव चंदनशिवे, परमेश्र्वर बनसोडे,बापु बनसोडे, सिताराम डावरे, महादेव बनसोडे,गौतम खांडेकर, रणजीत कांबळे, योगीराज चंदनशिवे, यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे आयोजन रिपाइं आठवले पक्षाचे माळशिरस तालुका युवक अध्यक्ष व शिव बुद्ध प्रतिष्ठान जांबुड चे संस्थापक अध्यक्ष मा.रविराज बनसोडे यांनी केले होते

# उल्हासनगर महानगरपालिकास्तरीय उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम



उल्हासनगर / बाळासाहेब अहिरे : उल्हासनगर महानगरपालिका पर्व मा. श्री. जमीर लेंगरेकर, प्रशासक तथा आयुक्त, (अतिरिक्त कार्यभार) उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आले, सदर बैठकीस मा.श्री. जमीर लेंगरेकर, प्रशासक तथा आयुक्त (अतिरिक्त कार्यभार). डॉ. सुभाष जाधव मा. उप-आयुक्त (वै.आ.वि), डॉ. मोहिनि धर्मा, वैद्यकिय आरोग्य अधिकारी, डॉ. किशोर चव्हाण, ड्चज, डॉ. विद्या चव्हाण, शहर कार्यक्रम व्यवस्थापक, वैद्यकीय अधिकारी, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र- १ ते ६. उमपा, श्रो. डी. कचरे, लिपीक- खउऊ इ. सदस्य उपस्थित होते.

सदर बैठकीची सुरूवात मा. डॉ. सुभाष जाधव, उप-आयुक्त (वे. आ.वि) यांनी केली. डॉ. मोहिनी धर्मा, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, यांनी प्रस्तावना सादर करत उल्हासनगर महापालिका कार्यक्षेत्रात पल्स पोलिओ मोहिमे करिता एकूण ५७९१४ लाभार्थी असून एकूण २९५ बुध व गृहभेटी साठी १७७ टीमचे नियोजन करण्यात आले आहे, अशी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर डॉ. किशोर चव्हाण, सर्व्हेलन्स मेडिकल ऑफिसर (ड्चज) यांनी उपराष्ट्रीय पल्स पोलिओ नसीकरण मोहिम या अभियानाची संपूर्ण रूपरेषा झ्ुशी झेळपीं झीशीशपींरींळेप द्वारे उपस्थितांना दिली

सदर बैठकीत बैठकीचे अध्यक्ष मा. श्री. जमीर लेंगरेकर, प्रशासक तथा आयुक्त, (अतिरिक्त कार्यभार) यांनी

१. सोशल मिडियाच्या माध्यमातून व धर्मगुरू यांच्या मार्फत जास्तीत जास्त प्रमाणात पल्स पोलिओ मोहिमेची प्रसिद्धी करावी. २. आपला दवाखाना येथे पोलिओ लसीकरणाचे बुथ लावणे. ३. नविन नियुक्त केलेल्या आशांना लसीकरण मोहिमेसाठी सहभागी करणे, ४. एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, यांना सदर मोहिमेत सहभागी होण्यास माहिती देणे. ५. शैक्षणिक संस्थाना सदर मोहिमेत (छडड) यांना सहभागी करून घेणे ६.महिला बाल विकास विभाग यांना मनुष्यबळ मिळण्यासाठीचे नियोजन करणे ७,महिला बचत गट यांना मनुष्यबळ मिळण्यासाठी नियोजन करणे ८. सदर मोहिमेची जनजागृती अति उत्कृष्ट करण्यासाठी मराठी व सिधी व्यतीरिक्त हिंदी बॅनर छपाई करून जनजागृती करणे, ९. वैद्यकिय अधिकारी. ना. प्रा. आ. केंद्र १ ते ६ सर्व यांनी खख.ठ व ऊशशि त्रीशशूशी ची इरलर्ज्ञी झिश्ररप ची पडताळणी करणे. १०. सदर मोहिमेच्या बुथच्या दिवशी ८०% च्या वर लाभार्थ्यांना लाभ मिळावा याची दक्षता घेणे, ११. स्थलांतरित वस्तीतील मुलांचे लसीकरण पूर्ण झाले किंवा ाही याचा आढावा घेणे, नसेच पल्स पोलिओ लसीकरण मोहिम हे अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक सर्व विभागांनी कार्य करणेबाबत सर्व समिति सदस्यांना विनंती करण्यात आले व उपस्थित सर्व समिती सदस्यांचे आभार मानून चव्हाण मॅडम यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे घोषित केले

# येत्या शनिवारी पुण्यात स्वेरीच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय व माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या शनिवार, दि.०९ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता 'राष्ट्रसेवादल भवन, पर्वती पायथा, सिंहगड रोड, पुणे' या ठिकाणी स्वेरी अभियांत्रिकीच्या व व्यवस्थापन (एमबीए) या अभ्यासक्रमांच्या माजी विद्यार्थ्यांकरिता 'ऋणानुबंध २०२३-२४' या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी स्वेरीतून शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे.' असे आवाहन स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी केले आहे.





अभियांत्रिकी व एमबीए चे शिक्षण झाल्यानंतर विविध कंपन्यांमध्ये व नोकरीसाठी अनेक माजी विद्यार्थी पुण्यात स्थायिक होतात. त्यांना या मेळाव्यात सहभागी होता यावे या दृष्टिकोनातून या मेळाव्याचे आयोजन पुण्यात केले गेले आहे. 'राष्ट्रसेवादल भवन, पर्वती पायथा, सिंहगड रोड, पुणे' या ठिकाणी होणाऱ्या या 'ऋणानुबंध २०२३-२४' या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात मनमुराद चर्चा, आपआपसात सुसंवाद, नव्या विचारांबरोबरच जुन्या आठवणींच्या शिदोरीची देवाण-घेवाण होणार असून आपण काम करत असलेल्या कंपनीत अथवा नोकरीत येत असलेले अनुभव यांचीही देवाण घेवाण होणार आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गुरुप्रसाद तेलकर, उपाध्यक्ष दत्तात्रय घोडके व सचिव प्रा. अविनाश मोटे यांनी 'स्वेरी अभियांत्रिकी व एमबीएच्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे.' असे आवाहन केले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सिर्डॅकचे जेष्ठ संचालक व इस्त्रोचे माजी शास्त्रज्ञ वसंत अवघडे हे उपस्थित राहणार आहेत. सदर मेळाव्यातून जुन्या आठवणींना उजाळा मिळणार आहे, तसेच गतकाळात घडलेल्या प्रमुख घटनांचा आढावाही घेण्यात येणार आहे. या मेळाव्यात पदवी अभियांत्रिकीच्या स्थापनेपासून म्हणजे १९९८ पासून ते गतवर्षीपर्यंत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी सहभागी होणार आहेत. स्वेरीमध्ये अभियांत्रिकीचे शिक्षण पुर्ण केल्यानंतर नोकरीच्या निमित्ताने विद्यार्थी पुणे, मुंबई, बेंगलोर तसेच भारतातील अन्य प्रमुख शहरांमध्ये व परदेशात स्थायीक झालेले माजी विद्यार्थी या मेळाव्यासाठी उपस्थित राहणार आहेत. एकूणच 'ऋणानुबंध २०२३-२४' च्या निमित्ताने पुन्हा एकदा स्वेरीतील जुना चिवचिवाट पुण्यात नव्याने घुमणार आहे हे मात्र नक्की! माजी विद्यार्थी मेळाव्यासंबंधी अधिक माहीतीसाठी ९९२३४०३७०८, ९८८१७७६१९६ व ८६९८३०३३८७ या क्रमांकावर संपर्क साधावा.' असे आवाहन करण्यात आले आहे.

# लक्ष्मी विष्णू मिल कामगारांना घरे उपलब्ध करून द्या


## प्रहार जनशक्ती पक्षाची महापालिकेकडे मागणी

सोलापूर ( प्रतिनिधी ):- सोलापूर शहरातील लक्ष्मी विष्णू मिल कामगारांना घरे बांधून देणेकामी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने ठराव क्र.२८२ दि.१०/१२/२०१६ रोजी ठराव करण्यात आलेला आहे. परंतु आजतागायत सदर ठरावावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करण्यात आल्याने लक्ष्मी विष्णू मिल कामगार आजही आपल्या हक्काच्या घरापासून वंचित आहेत. गेल्या २८ वर्षापासून लक्ष्मी विष्णू मिल कामगार आपल्या हक्कासाठी लढत आहेत. महानगरपालिकेशी वारंवार पत्रव्यहार करून अनेक निवेदने दिली, आंदोलने केली, परंतु याकडे शासन ले प्रशासनाकडून दुर्लक्षच करण्यात आल्याचा केले आहे आता तरी घरे उपलब्ध करून द्या अशा मागणीचे निवेदन प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे..



शहर सोलापूर येथील लक्ष्मी विष्णू मिलची जागा (नगर रचना योजना ४ अं.भू.क्र.१६४/१/अ) ही पूर्वी औद्योगिक वापर विभागात समाविष्ट होती. कालांतराने काही कारणास्तव काही मिल बंद पडली यावर उपाय म्हणून शासनाने कायदा करून ज्या ठिकाणी मिल बंद झाल्यास जागा मनपाकडे हस्तांतरित होत असते. मिल बंद झाली असेल तर आवश्यकतेनुसार रहिवास वापराकरिता द्यावी व जागेपैकी २५ टक्के जागा मनपाकडे हस्तांतरित होत असते. अशा २५ टक्के जागेवर मिल कामगारांचे पुनर्वसन करणे क्रमप्राप्त ठरत असल्याने सदर लक्ष्मी विष्णू मिल कामगारांच्या घरासाठी प्रथम प्राधान्याने घरे बांधून मिळणेकामी कार्यवाही करण्यात यावी तसेच ही जागा व घरे लक्ष्मी विष्णू मिल हजेरी पटावरील पात्र कामगार यांनाच देण्यात येत आहे. अशा प्रकारचा ठराव वरील क्रमांकाप्रमाणे दि.१०/१२/२०१६ रोजी करण्यात आला असून गेल्या सात वर्षापासून या ठरावावर महानगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे कामगार व त्यांच्या वारसदारांचा न भरून येणारा नुकसान होत आहे. तरी याबाबत येत्या आठ दिवसात याबाबत निर्णय घेऊन लक्ष्मी विष्णू मिल कामगारांसाठी राखीव असलेल्या जागेवर कामगारांना घरे देणेबाबत निर्णय घ्यावा. अन्यथा अचानकपणे प्रहार कडून आंदोलन करावे लागेल. मग होणाऱ्या परिणामास महानगरपालिकाच जबाबदार असेल असे निवेदनात म्हंटले आहे.. याप्रसंगी प्रहार जनशक्ती पक्षाचे सोलापूर शहर प्रमुख अजित कुलकर्णी, जिल्हा संपर्कप्रमुख जमीर शेख , शहर कार्याध्यक्ष खालिद मणियार, मिल कामगार प्रतिनिधी आदीनाथ शिंदे , कांबळे व आदी उपस्थित होते....

# कर्जाळ ग्रामपंचायत व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्या वतीने महामानवास अभिवादन



दुधनी/ निंगप्पा निंबाळः डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कर्जाळ ग्रामपंचायत येथे ग्रामपंचायत व बार्टीच्या वतीने ग्रामपंचायत सदस्य व उद्योजक चंद्रकांत इंगळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून त्रिशरण व पंचशील वंदना घेऊन महामानवाला अभिवादन करण्यात आले सदर अभिवादनास सरपंच श्रीमती बशिराबी बागवान उपसरपंच मिनाक्षी मल्लिनाथ डब्बे ग्रामसेवक फुलारी सर समतादुत नालंदा शिंदे ग्रामपंचायत सर्व सदस्य, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशआवर्कर, ग्रामपंचायत कर्मचारी, तंटामुक्त अध्यक्ष, पोलिस पाटील व ग्रामपंचायतील सर्व नागरिका उपस्थित होते .

# ध्वज दिन निधी २०२३ च्या उद्दिष्टापेक्षा दुप्पट निधी संकलन करण्यात येणार : अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे

*** सन २०२२ मध्ये १ कोटी ५४ लाख ४१ हजार ध्वज दिन निधी संकलनाचे उद्दिष्ट, तर १ कोटी ८१ लाख १२ हजार ८८८ ची पूर्तता, उद्दिष्टाच्या ११७% संकलन. * अप्पर जिल्हाधिकारी ठोंबरे यांच्या हस्ते सशस्त्र सेना ध्वज दिन निधी २०२३ संकलनाचा शुभारंभ**



सोलापूर/प्रतिनिधीः शासनाने सोलापूर जिल्ह्यास सन २०२२ मध्ये १ कोटी ५४ लाख ४१ हजाराचा सशस्त्र सेना दोस्ती निधी संकलनाचे उद्दिष्ट देण्यात आलेले होते. जिल्हा प्रशासनाने एकूण १ कोटी ८१लाखापेक्षा अधिक म्हणजे उद्दिष्टाच्या ११७ टक्के निधी संकलन केले आहे. तरी देशाच्या सीमांचे अहोरात्र संरक्षण करणाऱ्या सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांसाठी यावर्षी २०० टक्के निधी संकलन करू या असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी तथा प्र. जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी केले.

जुने जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात आयोजित सशस्त्र सेना ध्वज दिन निधी २०२३ संकलनाचा शुभारंभ कार्यक्रमात अप्पर जिल्हाधिकारी ठोंबरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार, कमांडर अशोक कुमार, मेजर पाटील, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन धार्मिक, राज्य परिवहन चे कामगार अधिकारी चंद्रकांत घाटगे व अन्य अधिकारी तसेच विविध संस्था, शाळा/महाविद्यालय चे विद्यार्थी, ३८ बटालियन चे एन. सी. सी. कॅडेट, माजी सैनिक, वीर माता, वीरपत्नी उपस्थित होते. अप्पर जिल्हाधिकारी ठोंबरे म्हणाले की भारताचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी तसेच अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आपले शुर सैनिक स्वतःच्या परिवारापासून दूर राहून आपले कर्तव्य बजावत आहेत. देशाचे भवितव्य अबाधित राखण्यासाठी अनेक जवान शहीद झालेले आहेत. अशा शुर सैनिका बद्दल कृतज्ञता व सदभावना व्यक्त करून त्यांचे ऋण अंशतः फेडणे तसेच पवित्र भावनेने सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलित करून सैनिकांच्या कल्याणकारी योजना या निधीतून येतात. तरी सन २०२२ चा निधी ११७ टक्के संकलन करून चांगले काम केले आहे. तरी यावर्षी दिलेल्या उद्दिष्टांच्या २०० टक्के निधी संकलन करून सैनिकाप्रती सद्भावना व्यक्त करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.सशस्त्र सेना ध्वजदिन निधी भारतात दरवर्षी ७ डिसेंबरमध्ये साजरा केला जातो. आर्मी, नेवी, वायुसेना हे तिघांचे हे प्रतिक आहे. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, शाळा, महाविद्यालय, सामाजिक संस्था विविध संस्थांच्या मदतीने हा ध्वजदिन निधी जमा केला जातो. सन २०२२ करिता महाराष्ट्र शासनाकडून सोलापूर जिल्हयास १ कोटी ५४ लाख ४१ हजार इतके उद्दिष्टये देण्यात आले होते. सदर उद्दिष्टांपैकी सोलापूर जिल्हयाने १ कोटी ८१ लाख १२ हजार ८८८ इतका निधी संकलित करुन शासनाकडे वर्ग केला आहे, अशी माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी दिली. प्रारंभी दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार यांच्या हस्ते प्रभारी जिल्हाधिकारी श्री. तुषार ठोंबरे व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.यावेळी वीर माता / वीर पत्नी यांचा श्री.ठोंबरे यांच्या हस्ते साडी, श्रीफळ, गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. दहावीत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या माजी सैनिक यांच्या पाल्यांचाही धनादेश व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सन २०२२ चे निधी संकलन उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी चांगले काम केलेल्या अधिकारी व विभागाचा गौरव करण्यात आला.

# मनोज जरांगे आणि छगन भुजबळ यांनी वाद मिटवावा नाहीतर मला वाद मिटविण्यास यावे लागेल : ना.आठवले




मुंबई : एक काळ असा होता की अनेक जाती स्वतःला मागास मानण्यास आणि आरक्षण मागण्यास तयार होत नसत.मात्र आता आरक्षणाचे महत्व सर्वांना पटत आहे.मराठा समाजाने आता आहे त्या ओबीसिंच्या आरक्षणातून आरक्षण मागू नये तर ओबीसी मध्ये स्वतंत्र प्रवर्ग करून ओबीसी म्हणूनच आरक्षण घ्यावे.मराठा समाजातील।ज्यांचे उत्पन्न ८ लाखांच्या आत आहे अशा गरीब मराठा समाजाला आरक्षण पाहिजे हीच मनोज जरांगे यांची मागणी आहे आणि त्या मराठा आरक्षण मागणीला आमचा पाठिंबा आहे.मनोज जरांगे पाटील आणि मंत्री छगन भुजबळ यांनी वाद मिटविला पाहिजे.महाराष्ट्रात सर्व समाजात सहिष्णुता आहे. वाद होणे योग्य नाही.जरांगे आणि भुजबळ यांनी वाद मिटवावा नाहीतर मला येऊन त्यांचा वाद मिटवावा लागेल असे आवाहन आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या ६७व्या महापरिनिर्वाणदिनी छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे रिपब्लिकन पक्षातर्फे आयोजित जाहीर अभिवादन सभेत ना रामदास आठवले बोलत होते

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर हे नेहरू मंत्रिमंडळात कायदा मंत्री होते त्याकाळात त्यांनी मी जरी काँग्रेस सोबत युती केली असली तरी मी कणखर आहे काँग्रेस च्या नदीत ढेकळा सारखे विरघळणार नाही असे म्हंटले होते त्यामुळे मी सुद्धा डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा सच्चा शिष्य आहे.मोदींसोबत असलो तरी माझ्या हाती निळा झेंडा आहे.मी कणखर असून ढेकळासारखा विरघळणार नाही . लोकसभेत आर पी आय चा

एकही खासदार नाही तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी मला केंद्रीय मंत्री मंडळात घेतले आहे .मी संसदेत जयभीम चा नारा बुलंद केला आहे असे ना रामदास आठवले यावेळी म्हणाले.शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले तसे मागसावर्गीयां चे कर्ज शासनाने माफ करावे अशी मागणी यावेळी ना रामदास आठवले यांनी केली. येत्या दि १६ डिसेंम्बर रोजी आयोजित जागतिक धम्मपरीदेत लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ना रामदास आठवले यांनी केले .

# भारतासारख्या लोकशाही देशात म्हेत्रे तांडा व शिवाजीनगर येथील नागरिकांना त्यांच्या हक्कासाठी लढा, जिल्हा प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष



अक्कलकोट/प्रतिनिधीः महाराष्ट्र शासन महाराष्ट्र मुंबई यांच्या आदेशानुसार माहे जानेवारी २४ या कालावधीत मुदत संपणाऱ्या नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायत करिता प्रभाग रचना कार्यक्रम सुरू आहे सदर कार्यक्रमांमध्ये अक्कलकोट तालुक्यात नुकत्याच नव्याने स्थापन झालेली गांधीनगर ग्रामपंचायतचा समावेश आहे गांधीनगर ग्रामपंचायत प्रभाग रचना करताना प्रशासनाकडून गांधीनगर ग्रामपंचायती पासून ३ किलोमीटर दूर असणाऱ्या दुधनी ग्रामीणचा भाग जोडला आहे परंतु गांधीनगरच्या लगत असणाऱ्या शिवाजीनगर व म्हेत्रे तांडा यांचा समावेश केला नाहीअक्कलकोट तालुक्यातील दूधनी ग्रामीण गांधीनगर शिवाजीनगर व म्हेत्रे तांडा येथील नागरिकांनी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना झाल्यापासून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये मतदानाचा हक्क बजावला नाही शिवाजीनगर व म्हेत्रे तांडा इथे नागरिकांनी यापूर्वी प्रशासनाला वारंवार याबाबत निवेदन देऊन सुद्धा प्रशासनाने तेथील नागरिकांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले आहे

प्रारूप प्रभाग रचना मध्ये म्हेत्रे तांडा व शिवाजीनगर तांडा यांना वगळल्याने नागरिकांनी त्यांचा हक्क मिळावा म्हणून हरकत नोंदवली आहे जगातील सर्वात मोठी लोकशाही देश म्हणून भारताकडे पाहिले जाते परंतु याच भारत देशामध्ये संविधानाने दिलेल्या हक्कापासून वंचित राहिलेल्या यावेळी प्रशासनाकडून न्याय मिळेल का याकडे सर्व तालुक्याचे लक्ष लागले आहे आमच्या प्रतिनिधीशी याबाबत बोलताना म्हेत्रे तांडा येथील सुशिक्षित नागरिक अशोक राठोड यांनी आम्हाला आमचा हक्क यावेळी मिळाला नाही तर माननीय उच्च न्यायालयात धाव घेऊन हक्कापासून वंचित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करणेबाबत दाद मागणार असल्याचे सांगितले




**महापरिनिर्वाण दिनानिमित्त सम्यक बुद्ध विहार सांस्कृतिक केंद्र, भडवळे (ता. दापोली) वतीने अल्पोपहाराचे वाटप** सम्यक बुद्धविहार सांस्कृतीक केंद्र भडवळे,ग्रामीण व मुंबई भावकी व महिलामंडळ ता. दापोली जी. रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई चैत्यभूमी येथे भारतीय घटनेचे शिल्पकार,महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरीनिर्वाण दिनानिमित्त देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या जनतेस अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. भडवळे बौद्धवाडी येथील ग्रामस्थांनी सामाजिक बांधिलकी जपत राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे



**दादर येथे चैत्यभूमीला आलेले बुद्धगया वरून भंतेजी कल्याण स्टेशनला भेटले त्यांना धम्मदान करून आशीर्वाद घेताना विजय शंकर घनघाव दैनिक यश सिद्धि न्युज मुंबई संपादक**

# २२ प्रतिज्ञा सत्य विज्ञान सामाजिक फाउंडेशन तर्फे डॉ.बाबासाहेबांना अभिवादन

## गंडे, दोरे कापून दिला अंधश्रद्धेला फाटा

ठाणे/मिलिंद जाधव : २२ प्रतिज्ञा सत्य विज्ञान सामाजिक फाउंडेशन तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनी शिवाजी पार्क मैदान येथे २२ प्रतिज्ञा पत्रकाचे वाटप करून २२ प्रतिज्ञा प्रचार आणि प्रसार माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन करण्यात आले. तसेच अभिवादन करायला आलेल्या अनुयायांना २२ प्रतिज्ञा समजाऊन सांगून त्यांच्या हातातले, गळ्यातले , पायातले गंडे दोरे, तविद, कडे कापून प्रबोधन करण्यात आले.




१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपुरच्या दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यावर आपल्या अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा देताना २२ प्रतिज्ञा देखील दिल्या होत्या. त्यांचे स्मरण करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. यावेळी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील पत्रके, बॅनर्सच्या माध्यमातून तरुणांनी २२ प्रतिज्ञांची माहिती भीम अनुयायांना देण्यात आली. तसेच त्यांच्यासोबत चर्चा करून त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सांगण्यात आले. त्यांच्या मेंदूतील अंधश्रद्धेचे गंडे ,दोरे कापण्याचे आले. घर, घर बुद्ध जयंती साजरी व्हावी आणि बुद्धांचे विचार प्रत्येकाच्या घराघरात रुजावे या करिता जनजागृती करण्यात आली.

'२२ प्रतिज्ञा अभियान' हा उपक्रम गेल्या १९ वर्षांपासून राबवत आहेत. तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्रत्येकाच्या घराघरात पोहचवण्यासाठी डॉ. बासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचे आचरण प्रत्येकाने केले पाहिजे. हातातील गंडे-दोरे कापून डॉ. बाबासाहेबांचे विचार सांगण्याचे काम व अंधश्रद्धा दूर करण्याचे काम २२ प्रतिज्ञा अभियान संपूर्ण टीम करीत आहे. या अभियानातून अंधश्रद्धा दूर होत असून, यातून समाजात परिवर्तन होताना दिसून येत आहे. व बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यास येणाऱ्या नागरिकांना वैज्ञानिक दृष्ट्या सक्षम करणे , त्यांना जागृत करण्याचे काम २२ प्रतिज्ञा अभियान करत आहे. २२ प्रतिज्ञा अभियान क्रांती करत आहे. जाती, सोषन संपविण्याचे अभियान , विज्ञानमय करण्याचे अभियान आहे. अंधश्रद्धेपासून मुक्त करण्याची अभियान असे निवृत्त सह आयकर आयुक्त अरविंद सोनटक्के यांनी बोलतांना सांगितले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्मदिक्षा घेत असतांनी संपूर्ण बांधवांसाठी २२ प्रतिज्ञा दिलेल्या आहेत ज्याला बौद्धांच्या स्वतंत्राचा जाहीरनामा म्हणू शकतो. २२ प्रतिज्ञा प्रतिज्ञाच पालन करणारा बौद्ध व्यक्ती है पूर्णपणे बुद्धांच्या विचारावर आणि मार्गावर चालतो. असे यावेळी प्राध्यापक डॉ. संजय खोब्रागडे, यांनी बोलताना सांगितले.

आपण ज्या मुखातून जय भीम बोलतोय त्या मुखात गुटखा तंबाखू, दारू पिऊ नका कोणतेच व्यसन करू नका त्याने स्वतःची तसेच कुटुंबाची हानी होते, म्हणून तंबाखू गुटखा दारू सोडा २२प्रतिज्ञाचे आचरण करा प्रचार प्रसार करा. असे असे २२ प्रतिज्ञा अभियान महाराष्ट्र प्रमुख प्रदिप जाधव यांनी बोलतांना सांगितले

गंडे ,दोरे कमी होत आहेत हे २२ प्रतिज्ञा अभियानाचे यश मानतो मी. या वर्षी शिवाजी पार्कमध्ये महाराष्ट्रातून येणाऱ्या नागरिकांच्या हातात, पुस्तकं, फोटो, पुतळे,मुर्त्या असं सर्व होत. परंतु महाराष्ट्राच्या बाहेरून आलेल्या नागरिकांच्या हातात गंडे दोरे मोठ्याप्रमाणावर दिसून येत होते. असे २२ प्रतिज्ञा अभियान प्रचारक विनोद पवार यांनी बोलतांना सांगितले. तुम्ही सुद्धा या अभियानाचे प्रचारक बनू शकता प्रचारक बनण्यासाठी २२ प्रतिज्ञा अभियानाचे प्रचारक बनण्यासाठी महाराष्ट्र प्रमुख प्रदिप जाधव - ७२०८७७७०५० यांच्याशी संपर्क साधू शकता.

# नामदेव निर्मळे यांचा ५२ थानपिर विजय दिनानिमित्त प्रशस्तीपत्र देऊन गौरव

कोल्हापू : येथे ५ डिसेंबर रोजी झालेल्या ५२ थानपिर विजय दिनानिमित्त पत्रकार नामदेव निर्मळे यांचा माजी ऑरनरीर कॅप्टन रमेश निर्मळे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. कोल्हापूर जिल्ह्यात प्रथमच ५२ विजय दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. यावेळी संपूर्ण परिवारासह अनेक आजी-माजी सैनिक उपस्थित होते.



# दुधनीत सामान्य नागरीकांच्या मुख्याधिकारी यांना अस्वच्छते बाबत निवेदन



अक्कलकोट/प्रतिनिधीः दुधनी येथे वार्ड नं दोन मध्ये घाणीचे साम्राज्य सांड पाण्याचे प्रश्र्न खूप गंभीर असतांना नगरपरिषद अधिकार्यांने दुर्लक्ष केल्याने संतप्त नागरिक सांडपाणी काढण्याचे मागणीचे निवेदन दुधनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आतीश वाळूंज यांच्या कडे दिले आहे.

दुधनी येथे वार्ड नं दोन मध्ये गवारीचे मोठे नाला असून दोन वर्षापूर्वी अतिवृष्टिमुळे नाल्याचे बाजूस असलेल्या भिंत कोसळल्यांने गटारीत सांड पाणी चे मोठ्य प्रमाणात साचल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण होवून आजु-बाजुला राहणार्या नागरिकास दुर्गंध व जंतूमुळे आरोग्य धोक्यात येत आहे. तरी वारंवार सांगून देखील काहीही प्रयोजन झाले नाही म्हणून आज संतप्त नागरिकांनी लेखी तक्रार मुख्याधिकार्यांकडे देण्यात आल्याचे माहिती रिपाइं(आठवले गट)चे मुस्लिम आघाडी शहर अध्यक्ष महेदिमिंया जिडगे यांनी दिली आहे.याप्रसंगी वार्ड नं दोन येथील कार्यकर्ते इमामसाब मकानदार,सैपनसाब मकानदार,शकिल शिकलगार, याशीन चौधरी,सैपन मकानदार, सैय्यद शेख,सैपन चौधरी,अमन अतार, कासार,लालु शिकलगार,नबि मणियार,अल्लाउद्दीन जिडगे,असलम खाटीक,मुनिर मणियार,नबी मणियार,महेंदिमिया जिडगे आदिंनी निवेदनावर सह्या करुन सुपूर्ध केली आहे.

दुधनी मुख्याधिकारीने जातीने लक्ष घालून वरील अस्वच्छते चे विल्हे वाट लवकरात लवकर करावे अन्यथा वॉर्डातील महिला व नागरीकांच्या वतीने मुख्याधिकारी व कर्मचारी यांच्या नावावर बोंबा बोंब आंदोलने छेडण्यात येईल

**-सैदप्पा झळकी**
**दुधनी रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सोलापूर**